गुलाम दिनमंहमद वसान वि.
श्रीमती कमरुनिसा दिनमहमंद वसान व इतर ८
CNRNOMHSO100008212022

**विशेष दिवाणी दावा क्र.३६१/२०२२ मधील निशाणी ५ खालील आदेश**

(दिनांक–१३/०८/२०२४)

प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी स्वतः अगर इतरांमार्फत वादीच्या दावा मिळकतीतील सामाईक कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करु नये व दावा मिळकतीचे साठेखत, विक्री, दान, गहाण, कर्जबोजा, बक्षिस व अन्य प्रकारे ति–हाईत इसमाचा हक्क निर्माण करु नये, यासाठी तात्पुरता मनाई आदेश मागितला आहे.

२. थोडक्यात अर्ज आहे की, वादी व प्रतिवादी क्र.१ ते ७ यांच्या घराण्याचे मुळ पुरुष दिनमहमंद हे होते, दि.२७/०८/२०२० साली ते मरण पावले. दिनमहमंद यांना शखरबी ही पत्नी होती, ती मरण पावली. वादी हा त्यांचा मुलगा आहे. दिनमहमंद यांना प्रतिवादी क्र.१ ही दुसरी पत्नी आहे. प्रतिवादी क्र.२ हा त्याचा मुलगा आहे. प्रतिवादी क्र.३ व ४ या त्यांच्या मुली आहेत. प्रतिवादी क्र.५ ही

प्रतिवादी क्र.२ ची पत्नी आहे. प्रतिवादी क्र.६ व ७ हे प्रतिवादी क्र.२ व ५ चे मुले आहे. वादी, प्रतिवादी क्र.१ ते ७ हे धर्माने मुस्लीम आहेत, त्यामुळे त्यांना मुस्लीम कायदा लागू होतो. दि.२७/०८/२०२० रोजी दिनमहमंद मरण पावल्यामुळे वादी, प्रतिवादी क्र.१ ते ८ हे त्यांचे वारस आहेत. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या दरम्यान दावा मिळकतीचे अद्याप सरसनिरसमानाने वाटप झालेले नाही. दि.२७/०८/२०२० रोजी दिनमहमंद मरण पावल्यानंतर वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे मुस्लीम कायद्याप्रमाणे वारस असल्याने फेरफार नं.१३२८९ ने नोंदी झाल्या आहेत. दावा मिळकती या दिनमहमंद यांनी वादी, प्रतिवादी क्र.१ ते ७ यांच्या कुटूंबियांसाठी खरेदी केल्या आहेत. दावा मिळकत ग.नं.७७६/१ हे दिनमहमंदने खरेदीने घेतल्या, परंतु खरेदीखत प्रतिवादी क्र.२ च्या नावाने झालेले आहे. दावा मिळकतीवर वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचा सामाईक कब्जेवहिवाट आहे. असे असताना, प्रतिवादी क्र.२ ने दावा मिळकत ग.नं.७६९, क्षेत्रफळ ८७आर व ग.नं.७७६/१ पैकी २०आर हे प्रतिवादी क्र.९ ला विक्री केली आहे, त्यास प्रतिवादी क्र.१ ते ७ हे एकमिलाकी झाले आहेत. प्रतिवादी क्र.२ ने, प्रतिवादी क्र.८ ला दावा मिळकत ग.नं.७७६/१ पैकी ३०आर मिळकत दि.२८/०२/२०२२ रोजी

खरेदीखत करुन दिले आहे, ते खरेदीखत वादीवर बंधनकारक नाही. वादीने दि.१२/०८/२०२२ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द करुनही त्याचा दावा मिळकती खरेदी करण्याचा अग्रहक्क असताना देखील प्रतिवादी क्र.२ ने वर नमुद दावा मिळकत हिचे खरेदीखत प्रतिवादी क्र.८ व ९ ला करुन दिले आहे. वादीने वाटप होण्यासाठी दावा दाखल केला आहे, त्यामुळे वादीच्या दावा मिळकतीतील सामाईक कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी हरकत अडथळा करण्यास व प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी दावा मिळकतीचे हस्तांतरण करण्यास तात्पुरती मनाई द्यावी, यासाठी अर्ज केला आहे. वादीच्या हक्कात सकृतदर्शनी प्रकरण आहे. अर्ज नामंजूर केला तर वादीचे न भरुन येणारे नुकसान होईल, न्यायाचे माप वादीच्या हक्कता आहे म्हणून अर्ज मंजूर करावा.

३. प्रतिवादी क्र.१ ते ७ यांनी त्यांची लेखी म्हणणे नि.क्र.३२ वर दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, वादी व प्रतिवादीचे मुळ पुरुष अलीमहमंद होते. फेरफार नं.२२११ अन्वये तहसिलदार, माळशिरस यांनी दि.१८/०२/१९९० रोजी वाटपाचा आदेश पारित केला, त्यामध्ये मुळ पुरुष अली महमंद, त्यांचा मुलगा याकुब ताजोद्दीन, दिनमहमंद व जैनोद्दीन यांच्यादरम्यान वाटप झाले आहे. त्यासोबत

याकुब व त्याची मुलं ताजोद्दीन व त्यांची मुलं, दिनमहमंद व त्यांची मुलं यांच्यात वाटप झाले आहे. त्यामध्ये दिनमहमंद यांच्या हिस्स्यास म्हाळुंग येथील ग.नं.६३४/३ क्षेत्रफळ १हे.०१आर, पोटखराब ०७आर, वादी गुलाम यांच्या हिस्स्यास म्हाळुंग येथील ग.नं.७६८, क्षेत्रफळ १हे २८आर प्रतिवादी क्र.२ च्या हिस्स्यास ग.नं.७६९, क्षेत्रफळ ८७आर अशा जमीनी दिल्या आहेत. म्हणजे वादीचे आजोबा, वडील, चुलते, सख्खे व चुलत भाऊ यांच्या दरम्यान वाटप झालेले आहे. वादीला वाटपाने त्याच्या हिस्स्यास आलेली मिळकत ग.नं.७६८ क्षेत्रफळ १हे.२८आर ही दाव्यामध्ये समाविष्ट केली नाही. वादीने त्यांच्या नावाने असलेल्या जमीनीचे या दाव्यात समाविष्ट करणे आवश्यक होते, परंतु समाविष्ट केलेल्या नाहीत. प्रतिवादी क्र.२ ने ग.नं.७७६/१ स्वकष्टार्जित उत्पन्नातून खरेदी केली आहे. दावा मिळकत ग.नं.७६९ ही प्रतिवादी क्र.२ च्या हिस्स्यात वाटपाने फेरफार नं.२२११ ने आलेली आहे, तेव्हापासून प्रतिवादी क्र.२ या मिळकतीच्या स्वतंत्र कब्जेवहिवाटीत आहे. म्हणून प्रतिवादी क्र.२ ने सदरची मिळकत प्रतिवादी क्र.८ व ९ ला विक्री केली आहे, त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.८ व ९ त्यांच्या मिळकतीच्या ताब्यात आहेत. म्हणून वादी हा सदर मिळकतीचा सहहिस्सेदार नाही. म्हणून अर्ज नामंजूर करावा.

४. प्रतिवादी क्र.८ ने या दाव्यात लेखी कैफीयत व या अर्जास त्याचे म्हणणे नि.क्र.३० वर दाखल केले आहे. थोडक्यात त्यांचे म्हणणे आहे की, फेरफार नं.२२११ ने दावा मिळकत ग.नं.७६९ प्रतिवादी क्र.२ च्या हिस्स्यास आलेला आहे व वादीच्या हिस्स्यास म्हाळुंग येथील ग.नं.७६८ आलेला आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांच्यात वाटप झालेले आहे, परंतु वादीने त्याच्या हिस्स्यास आलेली मिळकत या दाव्यात समाविष्ट केलेली नाही. दावा मळकत ग.नं.७७६/१ हे प्रतिवादीने खरेदी केलेली मिळकत आहे, त्याची स्वकष्टार्जित आहे, म्हणून वादीचा या मिळकतीशी काही हक्कसंबंध नाही. प्रतिवादी क्र.८ हा खरेदी तारखेपासून दावा मिळकतीचा कब्जे वहिवाटदार आहे. म्हणून अर्ज नामंजूर करावा.

५. माझ्या विचारार्थ निघालेले मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेतः–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीच्या हक्कात सकृतदर्शनी प्रकरण आहे काय? | **अंशतः होकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या हक्कात आहे काय? | **अंशतः होकारार्थी** |
| ३. | अर्ज नामंजूर केला तर, वादीचे नुकसान होईल काय? | **अंशतः होकारार्थी** |
| ४. | आदेश? | **अर्ज अंशतः मंजूर केला आहे.** |

**मुद्दा क्र.१ ते ४ बाबतः**–

६. मी, वादी व प्रतिवादीच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने कागदपत्रांची यादी नि.क्र.४ सोबत दावा मिळकत ग.नं.६३४/३ क्षेत्रफळ १हे.०१आर व ७७७, ५१आर याचा गावनमुना ८अ दाखल केला आहे. यानुसार, प्रतिवादी क्र.१, २, वादी, प्रतिवादी क्र.३ व ४ यांचा त्यावर सामाईक उल्लेख आहे, त्याचबरोबर दावा मिळकत ग.नं.६३४/३ यावरही त्यांचा सामाईक नावाचा उल्लेख आहे. ग.नं.७६९ यावर प्रतिवादी क्र.२ च्या नावाचा उल्लेख आहे. दावा मिळकत ग.नं.७७६/१ यावर प्रतिवादी क्र.२ व प्रतिवादी क्र.८ यांच्या नावाचा उल्लेख आहे. प्रतिवादी क्र.२ च्या नावाने एकूण क्षेत्रफळापैकी ७७.५०आर व प्रतिवादी क्र.८ च्या नावाने ३०आर असे क्षेत्रफळाची नोंद आहे. दावा मिळकत ग.नं.७७७ यावर वादी, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांच्या सामाईक नावाची नोंद आहे.

७. अकलूज येथील सि.स.नं.९७६, मालमत्ता क्र.१५४२ हे दुकान दिनमहमंद अलीमहमंद यांच्या नावाने आहे. तसेच अकलूज येथील मालमत्ता क्र.१५४३ ही प्रतिवादी क्र.१ च्या नावाने आहे.

८. प्रतिवादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, फेरफार नं.२२११ ने वादी व प्रतिवादी क्र.२ यांचे आजोबा, वडील, चुलते व वादी, प्रतिवादी क्र.२ यांच्यात वाटप झाले आहे, ते वाटप तहसिलदार, माळशिरस यांच्या आदेशाने झालेले आहे, त्यामुळे त्या वाटपाच्या आदेशानुसार, प्रतिवादी क्र.२ हा दावा मिळकत ग.नं.७६९ चा स्वतंत्र कब्जे वहिवाटदार मालक आहे, त्यामुळे दावा मिळकत ग.नं.७६९ एकूण क्षेत्रफळ ८७ आरचे खरेदीखत प्रतिवादी क्र.९ च्या हक्कात करुन दिले आहे, त्यामुळे वादीचा या कब्जेवहिवाटीस, त्या दावा मिळकतीशी काही हक्कसंबंध नाही. वादीने या खरेदीखताची प्रमाणित प्रत, कागदपत्रांची यादी नि.क्र.४ सोबत दाखल केली आहे, या खरेदीखतास प्रतिवादी क्र.५, ६ व ७ यांनी संमत्ती दिली आहे. फेरफार नं.२२११ यानुसार वादी व प्रतिवादी क्र.२ चे आजोबा, वडील, चुलते व वादी व प्रतिवादी क्र.२ यांच्यात वाटप झाल्याचे दिसून येते, त्यानुसार, ग.नं.७६९ क्षेत्रफळ

८७आर प्रतिवादी क्र.२ च्या हिस्स्याला गेलेले आहे व ग.नं.७६८ वादीच्या हिस्स्याला गेले आहे. जेव्हा दावा मिळकत ग.नं.७६९ प्रतिवादी क्र.२ च्या हिस्स्याला दि.१८/०२/१९९० च्या तहसिलदार, माळशिरस यांच्या आदेशाने झालेले आहे आणि त्यास वादी अथवा प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी आक्षेप घेतलेला नाही, त्यामुळे दावा मिळकत ग.नं.७६९ प्रतिवादी क्र.२ च्या स्वतंत्र कब्जेवहिवाटीची आहे, तो त्याच्या इच्छेनुसार या मिळकतीची विल्हेवाट करु शकतो. म्हणून ग.नं.७६९ करीता तात्पुरता मनाई हुकूम देण्याची गरज नाही.

९. प्रतिवादी क्र.२ ने, प्रतिवादी क्र.८ च्या हक्कात दि.२८/०२/२०२२ रोजी ग.नं.७७६/१ एकूण क्षेत्रफळ १हे०७.५०, पोटखराब २०आर यापैकी ७७.५० व ३०आर विक्री केली आहे. प्रतिवादी क्र.२ च्या कथनानुसार, ग.नं.७७६/१ ही त्याची स्वकष्टाची मिळकत आहे, ती त्याने खरेदी केली आहे, त्यामुळे त्याच्या इच्छेने तो दावा मिळकत ग.नं.७७६/१ चे विल्हेवाट करु शकतो. परंतु, वादीच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, दावा मिळकत ग.नं.७७६/१ ही मिळकत वादी व प्रतिवादी क्र.२ चे वडील दिनमहमंद यांनी गोवर्धन नामदेव सावंत यांच्याकडून दि.२४/०८/१९९४ रोजी खरेदीने घेतली आहे, त्यामुळे ग.नं.७७६/१ ही वादी व प्रतिवादी क्र.२ यांची

सामाईक मिळकत आहे, ही मिळकत विकण्याचा किंवा त्याचे साठेखत करुन देण्याचा प्रतिवादी क्र.२ ला काही अधिकार नाही. फेरफार नं.२२११ हा दि.३०/०३/१९९० ला प्रमाणित झाला आहे. दिनदयाल यांनी ग.नं.७७६/१ हे दि.२४ ऑगस्ट, १९९४ रोजी गोवर्धन सावंत यांच्याकडून खरेदीने घेतले आहे, त्यामुळे वादी व प्रतिवादी क्र.२ यांचा या मिळकतीवर दिनदयाल यांचे वारस म्हणून सामाईक कब्जेवहिवाट आहे, ही मिळकत दिनदयाल यांनी फेरफार नं.२२११ च्या नंतर खरेदीने घेतली आहे, ते खरेदीखत दि.२८फेब्रुवारी २०२२ रोजी झालेले आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ ला प्रतिवादी क्र.८ याला दावा मिळकत ग.नं ७७६/१एकूण क्षेत्रफळापैकी ३०आरचे खरेदीखत करुन देण्याचा काही अधिकार नाही कारण त्यावर वादी, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांची सामाईक कब्जेवहिवाट आहे. दिनदयाल यांच्या मृत्युनंतर या मिळकतीचे वादी, प्रतिवादी क्र.१ ते४ यांच्यात यांची हिस्सेवारी निश्चित आहे, परंतु त्या हिस्स्याची पृथकपणे वाटप होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी क्र.२ ने, प्रतिवादी क्र.९ च्या हक्कात ग.नं.७७६/१ चे कब्जेसाठेखत व त्यानंतर खरेदीखत करुन दिले आहे, त्याचे क्षेत्रफळ एकूण क्षेत्रफळापैकी ७७.५० व पोटखराब २०आर ऐवढे आहे.

१०. वादी व प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे ग.नं.७७६/१ क्षेत्रफळ १हे०७.५आर व पोटखराब २०आर यावर सामाईक कब्जेवहिवाट आहे, त्या सामाईक कब्जेवहिवाटीस प्रतिवादी क्र.८ व ९ यांना खरेदीखत अथवा कब्जेसाठेखत याद्वारे हरकत अडथळा करता येणार नाही. प्रतिवादी क्र.१ ते ५ व ६ व ७ यांचा मिळकतीवर सामाईक कब्जेवहिवाट आहे, त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ७ यांना या मिळकतीचा उपभोग घेण्यापासून मनाई करता येणार नाही.

११. या दाव्यात दावा मिळकत ग.नं.६३४/३, ग.नं.७७७, सि.स.नं.९७४/१ व सि.स.नं.९७६, ग.नं७७६/१ व ७६९ यासाठी मनाई मागितलेली आहे, परंतु ग.नं.७६९ हा फेरफार नं.२२१ च्या वाटपाने प्रतिवादी क्र.२ च्या हिस्स्यास गेलेला आहे, त्यामुळे त्यासंबंधी तात्पुरती मनाई देता येणार नाही. फेरफार नं.२२११ मध्ये ग.नं.६३४/४, ७६८, ७६४/१ब, ४६५ व ग.नं.१०४२/१, १०४२/२, १०४२/३,१०४२/४, ६३४/१ ६३४/२, ६३४/३ चा उल्लेख केलेला आहे. ग.नं.६३४/३ हा फेरफार नं.२२११ ने दिनमहमंद अलीमहमंद यांच्या हिस्स्याला आलेला आहे. दिनमहमंद अली महमंद यांच्या मृत्युनंतर वादी व प्रतिवादी क्र.१ ते ७

यांचा या मिळकतीवर वारसाने हक्क व अधिकार आहे, त्यामुळे ही मिळकत प्रतिवादी क्र.१ ते ५ यांना विक्री करता येणार नाही किंवा त्यांचे हस्तांतरण करता येणार नाही. या मिळकतीशिवाय इतर मिळकती या फेरफार नं.२२११ मध्ये समाविष्ट नसल्यामुळे त्याचे वाटप झालेले नाही, तसे वाटप झाल्याबद्दलचा दस्तऐवज प्रतिवादी क्र.१ते ९ यांनी दाखल केलेला नाही. परंतु वर नमुद केल्याप्रमाणे, वादी व प्रतिवादी क्र.१ ते ७ हे एकाच कुटूंबातील असल्याने, त्यांच्याविरुध्द या मिळकतीसंबंधी कब्जेवहिवाटीसाठी तात्पुरती मनाई देता येणार नाही, परंतु प्रतिवादी क्र.२ ने सामाईक कब्जेवहिवाटीची दावा मिळकत ग.नं.७७६/१ चे हस्तांतरण केलेले आहे, त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ते ९ यांच्याविरुध्द त्यांनी दावा मिळकतीचे हस्तांतरण करु नये, यासाठी मनाई देणे गरजेचे आहे. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर ''अंशतः होकारार्थी'' देतो व मुद्दा क्र.४ चे उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश करतो.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.८ व ९ यांनी, वादीच्या व प्रतिवादी क्र.१ ते ७ यांच्या ग.नं.७७६/१ च्या सामाईक कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करण्यास या दाव्याचा निकाल लागेपर्यंत तात्पुरती मनाई केली आहे.

२. प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी दाव्यात नमुद केलेल्या, दावा मिळकत गट क्र.७६९ शिवाय इतर मिळकतीचे या दाव्याचा निकाल लागेपर्यंत, कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करणेस तात्पुरती मनाई केली आहे.

३. ग.नं.७६९ या मिळकतीसंबंधी हा अर्ज नामंजूर केला आहे.

४. अर्जाचा खर्च दाव्यात.

स्वाक्षरीत/-

दिनांक -१३/०८/२०२४. (उ.वि.जोशी)

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, माळशिरस.